**सुधारित** **क्रमांक :- ९८**

# महाराष्ट्र विधानपरिषद

## पत्रक भाग दोन

**गुरुवार, दिनांक ४ डिसेंबर, २०२५ / अग्रहायण १३ (शके)**

**संदर्भ :- या सचिवालयाचे पत्रक भाग दोन क्रमांक ९५ गुरुवार दिनांक २० नोव्हेंबर, २०२५.**

**१११**. सर्व मा.सदस्यांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र विधानपरिषदेच्या सन २०२५ च्या तृतीय (हिवाळी) अधिवेशनाकरीता सर्वसाधारण व प्रश्नातून उद्भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना सोमवार, दिनांक १ डिसेंबर, २०२५ रोजीपासून कार्यालयीन वेळेत **QIS** या संगणकीय प्रणालीवर ऑनलाईन (**Online**) पध्दतीने स्वीकारण्यात येत आहेत.

महाराष्ट्र विधानपरिषद कामकाज सल्लागार समितीच्या दिनांक ३ डिसेंबर, २०२५ रोजी झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आलेल्या निर्णयानुसार आगामी अधिवेशनाचा कालावधी हा सोमवार दिनांक ८ डिसेंबर, २०२५ ते रविवार दिनांक १४ डिसेंबर, २०२५ असा निश्चित करण्यात आला आहे.

त्यामुळे संदर्भाधिन पत्रक भाग-२ मध्ये सुधारणा करण्यात येत असून त्यानुसार स्वीकृत अर्धा-तास चर्चेच्या सूचनांचे बॅलटकरीता खाली दर्शविल्याप्रमाणे दिवस निश्चित करण्यात आले आहेत. सदर बॅलट विधान भवन, नागपूर येथील कार्यालयात **श्रीमती पुष्पा दळवी, अवर सचिव** यांचे मुख्य इमारत दालन क्रमांक १६ व **श्रीमती संगिता विधाते, अवर सचिव (समिती)** यांचे विस्तारीत इमारत दालन क्रमांक १६ (ब) येथे घेण्यात येईल. उक्त बॅलटचा तपशील खालील विवरणपत्रात दर्शविण्यात आला असून त्यामध्ये बॅलटचा दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (१) मध्ये, अर्धा-तास चर्चेचा दिनांक विवरणपत्राच्या स्तंभ (२) मध्ये, बॅलटची वेळ विवरणपत्राच्या स्तंभ (३) मध्ये व बॅलट घेणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव विवरणपत्राच्या स्तंभ (४) मध्ये दर्शविण्यात आले आहे.

| बॅलटचा दिनांक (१) | अर्धा-तास चर्चेचा दिनांक (२) | वेळ (३) | अधिकाऱ्यांचे नाव (४) |
|---|---|---|---|
| सोमवार, दि. ८ डिसेंबर, २०२५ | मंगळवार, दि. ९ डिसेंबर,२०२५ | सकाळी ११.०० वा. | श्रीमती पुष्पा दळवी अवर सचिव |
| मंगळवार, दि. ९ डिसेंबर,२०२५ | बुधवार, दि. १० डिसेंबर, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्रीमती संगिता विधाते अवर सचिव (समिती) |
| बुधवार, दि. १० डिसेंबर,२०२५ | गुरुवार, दि. ११ डिसेंबर, २०२५ | सकाळी १०.३० वा. | श्रीमती पुष्पा दळवी अवर सचिव |

..२/-

सर्वसाधारण व प्रश्नातून उद्भवणाऱ्या अर्धा-तास चर्चेच्या सूचना QIS या संगणकीय प्रणालीवर ऑनलाईन (Online) पध्दतीने स्वीकारण्यात येतील. याची कृपया नोंद घ्यावी.

| | |
|---|---|
| **विधान भवन** | **डॉ. विलास आठवले** |
| **नागपूर** | **सचिव -३,** |
| **दिनांक : ४ डिसेंबर, २०२५** | **महाराष्ट्र विधानपरिषद** |

याची प्रत :-

१. महाराष्ट्र विधानपरिषदेचे सर्व मा.सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी व सर्व कक्ष.
३. महाराष्ट्र विधानमंडळातील सर्व पक्ष कार्यालये.
४. संगणक कक्ष (Website).
५. MKCL